## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सोमवार दि. २९ ऑगस्ट २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १४२ वी बैठक सोमवार दि.२९ ऑगस्ट २०११ रोजी दुपारी २.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ३) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ४) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| ५) | मा.श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा.श्री.तारिक फारुकी | सदस्य |
| ८) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| ९) | कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव,म.न.पा. | निमंत्रक |
| १०) | डॉ.श्री.रमेश सुरवाडे | सहमुख्य अधिकारी |
| ११) | श्री.महिषी,निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १४२ व्या बैठकीत सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सर्व सन्मा.सदस्यांना विषयसूची पाठविली असल्याचे सांगून मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १४२.१**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.३०/७/२०११ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

-------------

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते वर सादर करण्यांत आले आहे.

बैठकीच्या सुरुवातीस सन्मा सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागील बैठकीत घेतलेल्या काही विषयाबाबत चर्चा केली व काही बाबी मार्गी लागल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, १९१ - ताडदेव येथे एक इमारत असून तिचे बांधकाम पूर्ण झालेली आहे, तेथे अशी बाब निदर्शनास आलेली आहे की, त्या इमातीमध्ये मूळ भाडेकरु कमी होते परंतु विकासकांनी चुकीचे कागदपत्र सादर केलेले आहे व बांधकामही परवानगी प्रमाणे झाल्याचे निदर्शनात येत नाही. तरी ही बाब तपासावी व त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यांत यावी असे सुचविले. याबाबत त्यांनी संबंधित अधिका-यांना पत्रही दिल्याचे निदर्शनास आणून दिले होते याबाबत झालेल्या कार्यवाहीबाबत खुलासा करावा.

मा.मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ यांनी संबंधित कार्यकारी अभियंता याबाबत विचारणा केली त्यांनी सांगितले की, सदर इमारतीची प्रत्यक्ष पहाणी केली असता, तेथे मूळ भाडेकरु एकूण १० होते, परंतु सध्या सदर इमारतीत रहात असलेल्या व्यक्ति हे मूळ रहिवाशी नसून अन्य व्यक्ति आढळून आलेले आहेत. यावर मुख्य अधिकारी यांनी संबंधित अधिका-यांना सूचना केल्या की, सदर विषयाबाबत सखोल चौकशी करुन, सदर इमारतीत रहात असलेल्या व्यक्ति हे अनधिकृत आहे का, तेथे रहात असलेल्या सर्व भाडेकरु/रहिवाशांचे पुनर्वसन झालेले आहे किंवा नाही, सदर व्यक्तींनी गाळा विकत घेतलेला आहे किंवा कसे त्यांचेकडील कागदपत्र मागवून घेवून त्याची पडताळणी करावी व आपल्या कार्यालयातील रेकॉडप्रमाणे कागदपत्रांची पडताळणी करुन, त्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी, विकासकासही कार्यालयातर्फे पत्र पाठवून त्याचेकडून अतिरिक्त क्षेत्रफळ मंडळास देण्यांत आलेले आहे किंवा नाही, याचीही खात्री करावी, तसेच महानगर पालिकेशी संबंधित विषयाबाबत पत्रव्यवहार करण्यांत यावा. याबाबत झालेल्या कार्यवाहीबाबत पुढील बैठकीत माहिती सादर करण्यांत यावी.

सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.एस.आर.सुधारणेबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची चौकशी केली.

श्री.महिषी, सचिव यानी सदर प्रकरणी मा.मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांचेस्तरावर डी.एस.आर.सुधारित करणेबाबत बैठक घेण्यात आली असून, प्रत्येक बाबींचे दर विश्लेषण करण्याकरिता सर्व उपमुख्य अभियंता- परिमंडळ- १,२,३ व ४ / मुं.इ.दु.व पु.मंडळ यांच्यामध्ये बाबी विभागुन त्यांचे दरामध्ये सुधारण्या करण्याबाबत आदेश दिलेले असून त्यामध्ये सुधारणा/बदल करण्यांत येत आहेत.

मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं. यांनी यावर असे सांगितले की, ही सर्व कार्यवाही या महिन्यात पूर्ण होवून पुढील बैठकीत ठेवण्यांत यावी व मा.मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांना पुढील बैठकीत येण्याची विनंती करण्यात यावी म्हणजे याविषयी चर्चा करुन, त्यावर निर्णय घेणे सोईस्कर होईल व सर्व सन्मा.सदस्यांच्या शंकाचेही निरासन होईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना फारच चांगल्याप्रकारे बनविल्याचे सांगितले पुढे त्यांनी असे सुचविले की, अशाच प्रकारे आपल्या वितरण पत्रातही ब-याच त्रुटी आहेत. त्यामध्येही बदल होणे गरजेचे आहे. त्यामुळे व्हॅकेशन नोटीसप्रमाणे वितरण पत्राचाही नमुन्यामध्ये फेरबदल करुन नवीन नमुना तयार करण्यात यावा असे मागील बैठकीत सांगितले होते त्याबाबत झालेल्या कार्यवाहीबाबत आम्हाला अवगत करावे, अशी विनंती केली.

मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबतच्या कार्यवाहीस थोडा अवधी लागण्याची शक्यता आहे, जसे कि व्हॅकेशन नोटीस नमुना बनविण्यासाठी काही कालावधी लागला, तसेच सुधारित वितरण पत्र नमुना बनविताना पूर्वीच्या वितरण पत्रामध्ये असलेल्या त्रुटीचा अभ्यास करुन सर्व संबंधित अधिका-यांची बैठक घेवून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन प्रस्तावावर विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे अभिप्राय घेवून तद्नंतर मा.उपाध्यक्ष/प्रा यांची मंजूरी घेतल्यानंतर त्याचे प्रारुप तयार करण्यांत यावे, जेणेकरुन आता पर्यन्त झालेल्या गैर प्रकारांना आळा बसेल, वितरण पत्राचा नमुना बनविणेबाबत मुख्य अधिकारी यांनी सहमुख्य अधिकारी व उपमुख्य अधिकारी / पुगा यांना निर्देश दिले.

मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु.मंडळ यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना व प्रस्तावास मंडळाची मान्यता प्राप्त झालेली असून सदर विषयाची बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूरीस्तव सादर करण्यांत आलेली आहे. प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर नवीन व्हॅकेशन नोटीसचा नमुना वापरण्यात येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सारस्वत बॅकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे, त्यास प्रतिसाद चांगला मिळत असून त्यासाठी आपण भाडेकरु/रहिवाशांनी, जर तीन महिन्याचे भाडे एकदम भरल्यास त्यांना जी ३ टक्के सवलत द्यावयाची आहे, तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झालेली आहे का ? असे विचारले.

मा.मुख्य अधिकारी यांनी प्राधिकरणाची बैठक अजून झालेली नसल्याचे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीमध्ये एक अभ्यास गट संघटित करण्यांत आलेला होता त्यामध्ये मंडळाचे सन्मा.सदस्य तसेच श्री.अर्गेकर,उपमुख्य अभियंता हे निमंत्रक होते, या अभ्यास गटाने एक अहवाल तयार केला होता. सदर अहवालाबाबतची कार्यवाही कितपर्यंत झालेली आहे. अहवाल आजपर्यंत मंडळाच्या बैठकीत का ठेवण्यांत आलेला नाही.

मा.मुख्य अधिकारी यांनी अभ्यास गटाने सादर केलेला अहवाल मंडळाच्या बैठकीत ठेवणेबाबत निवासी कार्यकारी अभियंता यांना विचारले असता, त्यांनी असे स्पष्टीकरण

दिले की, अहवालात केलेले शिफारशीबाबत मुख्य अभियंता / विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे मत घेवून तद्नंतर सदर प्रस्ताव लवकरच मंडळाच्या बैठकीत ठेवण्यांत येईल नंतर शासनास सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यांत येईल. ही बाब महत्वाची असल्यामुळे त्यासाठी एक ते दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर निवासी कार्यकारी अभियंता व सचिव यांनी सांगितले की, अभ्यास गटाने तयार केलेल्या अहवालाची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना व मंडळाच्या अधिका-यांना पाठविण्यांत आलेली असून त्याप्रमाणे संबंधित उपमुख्य अभियंता हयांचेस्तरावर सुधारणा/सूचना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले त्यांच्या विभागातील भटचाळ, ताडदेव या विभागातील इमारतीस सन २००३ साली एनओसी देण्यांत आलेली असून त्या इमारतीची अत्यंत वाईटस्थिती असून विकासक त्याबाबत काही करीत नसल्याचे निर्दशनास आणून दिले.

श्री.शेठ, उपमुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले की,याबाबत विकासक व रहिवाशी यांची एकत्रित सुनावणी घेण्यांत आलेली असून, मागील आठवडयात मा.मुख्य अधिकारी यांचेकडेही भाडेकरु व विकासक यांचेसह सुनावणी घेण्यांत येवून लवकरच त्यामध्ये काही मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. तसेच विकासक यांनी आवश्यक ती मदत व दुरुस्त्या करुन देण्याचे आश्वासन दिले आहे.त्याबाबत मंडळाच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले सातआसरा ही इमारत पीएमजीपी प्रकल्पातर्फे बांधण्यात आलेली असून त्यामध्ये एका खोलीत स्लॅब कोसळून एका बाईच्या डोक्याला जखम झाल्याची बातमी दै. महाराष्ट्र टाईम्स वर्तमान पत्रात प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आणून दिले याबाबत मी पत्रही दिले होते तरी याबाबत मंडळातर्फे कोणती कार्यवाही झालेली आहे त्याची माहिती दयावी,

यावर मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी सर्व उपस्थित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना अशा सूचना केल्या की, सदर इमारत ही उपकर प्राप्त इमारत नसून ती मंडळाने पुनर्रचित केलेली नसली तरी, त्याची दुरुस्ती मंडळानेच करणे आवश्यक आहे, त्यामुळे संबंधित अभियंत्यांनी याबाबत निर्णय घेवून जेथे आवश्यकता आहे तेथे दुरुस्ती करुन घेणे गरजेचे आहे. तसेच अशा प्रकारचे मुद्दे मंडळाच्या बैठकीत चर्चेला पुन्हा पुन्हा येवू नये, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की. संकल्पसिध्दी ही इमारत फार जुनी असून ती मोडकळीस आलेली असून कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर इमारतीतील लोक आपल्या जीव मुठीत

धरुन रहात आहे. विकासक आपल्या लहरीपणाप्रमाणे इमारत खाली करणार का ? याबाबत आपण लक्ष घालणेबाबत त्यांनी मा.मुख्य अधिकारी यांना विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी उमरखाडी पीएमजीपीतर्फे बांधलेल्या ९ इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबतची कार्यवाही मंडळातर्फे होत आहे, तशीच कार्यवाही इतरही इमारतींच्या बाबतीत व्हावी, अशी विनंती केली. तसेच त्यांनी पुढे श्री.शंकर पार्टे सारख्या ब-याच व्यक्ती आज कित्येक वर्षे संक्रमण शिबिरात रहात असून , त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे सांगितले, कारण अशाच प्रकारे ब-याच इमारती अनधिकृतपणे उभ्या आहेत व त्यामध्ये अनधिकृत लोक रहात आहे. मात्र मूळ भाडेकरु/रहिवाशी हे वर्षांवर्षे संक्रमण शिबिरात रहात असून, त्यांचा काही दोष नसतांना त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही होणे गरजेचे आहे.

याबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, याबाबत मंडळातर्फे मास्टर लिस्टबाबत जो सर्व्हे केला, त्याव्दारे सुमारे ८००० अर्ज प्राप्त झालेले आहे, त्यानुसार कार्यवाही सुरु असून, त्यामध्ये सदर इमारत अनधिकृतपणे बांधलेली आहे की, पुनर्रचित झालेली आहे का, हे तपासणे शक्य झाले त्यानुसार आतापर्यंत तीन इमारती अनधिकृतरित्या बांधलेल्या असल्याचे निदर्शनात आले असून त्याबाबत कार्यवाही सुरु असून अशा इमारतीतील मूळ रहिवाशी/भाडेकरुंना मास्टर लिस्टमध्ये सामावून घेणेबाबत बाब टिप्पणी तयार करण्यांचे प्रस्तावित आहे, तसेच ही बाब धोरणात्मक असल्याने शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.विभागातील एका इमारतीची पहाणी करण्यांसाठी मागील आठवडयांत गेलो असता, संकल्पसिध्दी ही इमारत मोडकळीस आलेली असून, त्यामध्ये रहात असलेल्या भाडेकरु / रहिवाशानी तशा प्रकारचे पत्रही मंडळास दिलेले आहे. सदर इमारत आता दुरुस्तीच्या पलिकडे गेलेली असून, त्याची पुर्नबांधणी मंडळातर्फे करण्यांबाबत पत्र दिलेले आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, ज्या इमारती मंडळाने १९७० नंतरच्या १९९० पूर्वी बांधलेल्या असतील ,त्यामधील गाळयाचे क्षेत्रफळ १२०,१६५,१८० चौ फूट येवढे आहे. अशा इमारतीं आज वाईट स्थितीत ऊभ्या आहेत, त्यांचा देखभालीचा खर्चही दिवसे-दिवस वाढत आहे. त्यामुळे यापुढे ज्या इमारती दुरुस्ती पलिकडच्या आहेत , तसेच त्यांची दुरुस्ती करुन काहीच फायदा होणार नसेल, तसेच त्या इमारती धोकादायक असून, तेथे राहणा-या भाडेकरु/रहिवाशांच्या जिवितास धोका असेल अशा सर्व इमारती मग त्या पीएमजीपीने बांधलेल्या असतील किंवा मंडळातर्फे पुनर्रचित केलेल्या असतील अशा

इमारतींचा पुनर्विकास मंडळातर्फे विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) खाली करता येवू शकेल. याबाबत विचारविनिमय चालू आहे.

याकरिता मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व कार्यकारी अभियंता यांना सूचना केल्या की, वर नमूद केलेले मुद्दे विचारात घेवून अशा प्रकारच्या इमारतीबाबत तसेच ज्याचे क्षेत्रफळ ४०००मिटरपेक्षा जास्त असेल तर अशा इमारतींचा पुनर्विकास मंडळातर्फे करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करणे, तद्नंतर त्यास शासनाची मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत विचार करण्यांत येवू शकेल. वर नमूद केल्याप्रमाणे अशा इमारत विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) खाली घेणेबाबतचे प्रस्ताव तयार करण्यांत यावे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी म्हाडाने जमिन संपादन केलेल्या जागेवर एकत्रितपणे विकास करण्याचा प्रस्ताव होता, परंतु याबाबतची कार्यवाही होत नाही व बरेच वर्षे जमिन पडून राहते त्यानंतर सदर जमिनीवर अनधिकृत व्यक्ति आपले वास्तव्य करतात किंवा अनधिकृतपणे बांधकाम होवून इमारत ऊभी रहाण्याची शक्यता असते. तर असा प्रस्ताव आहे की, सदर जमिनीवर म्हाडाने विकास करावा असा प्रस्ताव मंडळातर्फे शासनास सादर करणेबाबत विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी चिंचपोकळी येथे अलिकडे मोतीवाणी म्हणून एक इमारत असून तेथे मा.श्री.छगनभुजवळ साहेब यांचे शुभहस्ते भूमीपूजन झालेले असून सदर इमारतीचे पुनर्बांधणीचे काम प्रलंबित आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर इमारतीच्या पुर्नबांधणीचा प्रस्ताव अंतिम टप्पावर असून लवकरच याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येवून कार्यवाही सुरु होण्याची शक्यता आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की काल दुपारी वाळकेश्वर येथील ७४-७६ सुभद्रा नावांची ही इमारत असून त्याइमारतीवर पाठीमागून भूभाग कोसळून यामध्ये वर्षा महाडीक ही मुलगी जखमी झालेली असून,सदर इमारतीचे दुरुस्तीचे काम मंडळातर्फे सुरु करण्यांत येणार होते परंतु पुढे काय झाले. सदरचे काम हे महानगर पालिकेचे असून ते करणेबाबत आम्ही प्रयत्न करणार आहेत. सदर इमारतीत मी व मंडळाचे अधिकारी श्री.सेठ उपमुख्य अभियंता यांनी काल प्रत्यक्ष व्हिजिट केली असून, सदर इमारतीचे दुरुस्तीचे काम मंडळातर्फे करण्यांत येणार असल्यामुळे सदर इमारतीत टेकू लावण्याचे कामसही लवकर सुरुवात करण्यांत यावी.

तसेच सायन,प्रतिक्षानगर येथे ड्रेनेज लाईन,गटारातील पाणी बाहेर येथे अशा विविध समस्या असून तेथे आतापर्यंत मी व संबंधित अधिकारी कार्यकारी अभियंता श्री.शेट्टी यांनी तीन वेळा व्हिजिट दिलेली असून तेथे राहणा-या भाडेंकरु/रहिवाशी हे अत्यंत वाईट स्थितीत रहात असून शौचालयाची दुरुस्ती, पावसाच्या पाण्याच्या निचरा नीट होत

नसल्यामुळे सदर पाणी तेथे साठून राहते त्यामुळे दिर्घकाळ दुर्गंधी रोगांचा साथी अशा वाईटस्थितीत तेथे नाईलाजास्तव वास्तव्य करीत आहे. जेथे आपण जास्तकाळ ऊभेही राहू शकत नाही. अशा स्थितीत सदर भाडेकरु रहात आहे. याबाबत मी वारंवार पत्रही दिलेली असून, सदर गटार लाईनबाबत लवकरच कार्यवाही करणेबाबत संबधित अधिका-यांना विनंतीही केलेली आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी संबंधित अधिका-यांना सूचना केली की, प्रतिक्षा नगर येथे पुनर्विकासाची स्कीम सुरु असल्यामुळे जुन्या संक्रमण शिबिरासाठी आपण खर्च करु शकत नाही. परंतु जेथे भाडेकरु/रहिवाशी रहात आहे. ज्या गोष्टी अत्यावश्यक आहे त्या आपणांस करणे बंधनकार आहे, तशा ब-याच गोष्टी आपण यापूर्वीही मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांची मंजूरी घेवून पूर्ण केलेल्या आहेत. तशा प्रकारे सदरची बाब अत्यत महत्वाची असल्यामुळे तेथे आपणांस चाळीची दुरुस्ती करावयाची नसून पाणी सांचण्याचा प्रश्न असून सदरचे काम आपण दुरुस्तीखाली न घेता परिसर सुधारण्याचा खाली सदरचे काम घेवून ते पूर्ण करणे अपेक्षित आहे. तरी याप्रमाणे कार्यकाही करण्यांत यावी.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी संजना या इमारतीचा जमिन भूसंपादनचा एक प्रस्ताव होता, त्याबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे.

यावर कार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की, सदर इमारतीचा पुनर्विकासाचा प्रस्ताव नुकताच प्राप्त झाला असुन छाननी सुरु आहे.

सन्मा.सदस्या.श्रीमती सुरेखा पाटील यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, २१-सी गोलालेद १९७६ साली मंडळाने खाली केली, १९७९ साली महानगर पालिका व म्हाडाने पत्राने कळविले की, ही इमारत रिझव्हेशन खाली असून सदर इमारत पुनर्रचित होणार नाही. १९९२ साली म्हाडातर्फे कळविण्यांत आले की, एमआरटीपी खाली सीटीआरतर्फे व सीसीटी ३७१ व्दारे महानगर पालिकेस कळविण्यांत आले की, १९९६ ला महानगरपालिकेने सदर जागेचा लिलाव करुन, सदर जागा महमद इलियास या व्यक्तिस विकलेली असून, जागेचा ताबाही देण्यांत आलेला आहे. सदर व्यक्तीने जागेवर अनधिकृतपणे बाधकाम करुन सदर इमारतीत वास्तव करीत आहे. सदर इमारतीतील मूळ १३ भाडेकरु होते. त्यातील काही मागठाणे बोरीवली, माहिम, प्रतिक्षा नगर व विक्रोळी येथील संक्रमण शिबिरात वास्तव्य करीत आहे. सदर व्यक्तिना मास्टर लिस्टमध्ये सुनावणीसाठी बोलविण्यांत आले होते, त्यासर्व मूळ भाडेकरुना मंडळातर्फे नोटीस पाठविण्यांत येवून अपात्र करण्यांत आलेले आहे. मी असे विचारु इच्छिते की, सदर भाडेकरुंना मूळ इमारतीत गाळा दिल्याशिवाय त्यांना मंडळातर्फे नोटीस कशी काय पाठविण्यांत आली तसेच सदर भाडेकरु हे आपले रहिवाशी असून त्यांचे पुनर्वसन करणे ही

आपली जबाबदारी आहे, तरी ही बाब अत्यंत गंभीर असून, याबाबत तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे.

मा.मुख्य अधिकारी यांनी संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या की, सदरच्या सर्व भाडेकरुंची मूळ कागदपत्र मागवून घ्यावी, तद्नंतर कार्यालयीन कागदपत्राशी पडताळणी करणे शक्य होईल तसेच सदर जागेवर जावून जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन साईट रिपोर्ट तयार करुन त्याची सखोल चौकशी करुन त्यांना न्याय देण्याबाबत कार्यवाही करावी, जोपर्यंत अंतिम कार्यवाही होत नाही. तोपर्यंत सदर भाडेकरु/रहिवाशांना नोटीस देण्यांत येवू नये.

सन्मा.सदस्या श्रीमती सुरेखा पाटील यांनी प्रभादेवी येथील गणेशकृपा या इमारतीतील एक गाळाबद्दल सांगितले होते. सदर गाळा श्री.सेठ, उपमुख्य अभियंता यांनी खाली करुन घेतलेला असल्यामुळे मी त्यांचे आभार मानते.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्मानिय सदस्यांचा असे निदर्शनास आणून दिले की, मंडळातर्फे रहिवास प्रमाणपत्राकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याअगोदर मंडळास अतिरिक्त देय क्षेत्रफळ का मागितले जात नाही हा मुद्दाही मागील बैठकीच्या कार्यवृत्तांत आलेला नाही.

यावर मा.अध्यक्ष महोदयांनी आपण मंडळास देय अतिरिक्त क्षेत्रफळ घेतल्याशिवाय रहिवास प्रमाणपत्र देत नाही, असे सांगितले व सचिव यांना सदर मुद्दा मागील बैठकीच्या कार्यवृत्तांत न आल्याबद्दल नोंद घेणेबाबत सूचना केली.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला की, प्रत्येक विभागातील कार्यकारी अभियंत्यांना त्या-त्या विभागातील पुनर्विकासाच्या योजनेमध्ये मंडळास देय अतिरिक्त क्षेत्रफळाबाबत जबाबदार ठरविण्यांत यावे व अतिरिक्त क्षेत्रफळ रहिवास प्रमाणपत्र देण्याअगोदर मंडळाच्या ताब्यात घेणेबाबतची कार्यवाही करण्यांत यावी. तसेच तिसरा मुद्दा ज्या ३३ प्रकरणामध्ये मंडळातर्फे पोलिस केसेस दाखल करण्यांत आल्या होत्या, त्याप्रकरणी झालेल्या कार्यवाहीबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांना पुढील बैठकीत माहिती देणेबाबत सूचना दयाव्यात.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, ३३ प्रकरणापैकी २९ प्रकरणांत विकासकावर गुन्हे दाखल करण्यांत आले असून, ४ प्रकरणाबाबत गुन्हे दाखल केलेले नाहीत. सदर प्रकरणी पोलिस विभागातर्फे कार्यवाही सुरु आहे व मंडळातर्फे त्याचा पाठपुरावा सुरु आहे. तसेच संबंधित कार्यकारी अभियंता यांना सदर कामावर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी संबंधित विकासकास ब्लॅक लिस्ट करण्याबाबत सांगितले.

त्यावर मा.मुख्य अधिकारी यांना संबंधित विकासक जे भाडेकरु/रहिवाशांच्या संम्मतीने नियुक्त केलेले असतात, त्यांचे मंडळामध्ये रजिस्टेशन नसते, त्यामुळे त्यांचेसंबंधित अशा प्रकारची कार्यवाही करणे शक्य नाही. तथापि विधी सल्लागार/प्रा. यांचेकडून विस्तृत कार्यपध्दती ठरवून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर मी मागील एक ते दोन वर्षात मंडळाच्या विविध अधिका-यांना पत्रे लिहिलेली आहे, परंतु मला येथे असे खेदाने नमूद करावेसे वाटते की, माझा पत्राचे उत्तर मला आजतागायत देण्यांत आलेले नाही. ही बाब मागील बैठकीत उपस्थित केली होती. त्यामध्ये निवासी कार्यकारी अभियंता यांना दि.१० मार्च २०११ यांना एक पत्र दिले होते त्यामध्ये मंडळातंर्गत विविध विषयाची माहिती विचारली होती.मला फक्त एक पत्र निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेले आहे. इतर विभागांची माहिती अप्राप्त आहे.

सन २००७ पासून २०११ पर्यंत किती गाळे होते व किती गाळे वितरीत केले, किती गाळे रिक्त आहेत याबाबतची यादी मागितली होती.तसेच एनओसीतंर्गत किती गाळे मंडळास प्राप्त झाले आहेत. याबद्‌दलची माहिती देणे अपेक्षित होते जी माहिती उशिरा देण्यांत आली तीसुध्या अपूर्ण व चुकीची निदर्शनास आलेली आहे. तसेच त्यांनी पुनर्विकासाबाबतही बरेच प्रश्न उपस्थित केले.

यावर मा.मुख्य अधिकारी/ दु.व पु. मंडळ यांनी सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी वर उपस्थित केलेल्या ब-याच मुद्दाबाबत सविस्तर माहिती दिली व चर्चाही केली. त्यांनी सर्व सन्मा.सदस्यांना सांगितले की, असे काही मुद्दे असतात की जे मंडळाच्या बैठकीत चर्चेला घेणे योग्य नाही, कारण यामध्ये मंडळाचाही वेळ जातो व इतर महत्वाचे विषय राहून जातात. तसेच जी काही आपल्या माहिती हवी असेल ती आपण संबंधित अधिका-याना भेटून घेवू शकतात, तसेच त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास आपण त्याचे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेशी चर्चा करुन समाधान करुन घेवू शकतात. तसेच मंडळाची बैठक ही धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेली असल्यामुळे असे विषय बैठकीमध्ये न घेण्याचे त्यांनी विनंती केली, तसेच त्यांनी असेही सुचविले की, जी काही आपल्या कार्यालयीन माहिती, कागदपत्र हवे असतील ती माहिती संबंधित अधिका-याकडून घेवू शकतात.

सहमुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अधिकारी (पुगा) यांचे कार्यालयातील सर्व नस्त्यांचे नंबरीग व फाईलची नोंद सुरु असून सदरचे काम अंतिम टप्पावर असल्याचे सांगितले तसेच सन्मा.सदस्य श्री.व्ही.जी.नायर यांनी उपस्थित केलेल्या वरील मुद्दाबाबत कार्यवाही सुरु असून त्याबाबतचा खुलासा/पत्र त्यांना लवकर देण्यांत येईल.

तसेच मा.मुख्य अधिकारी यांनी सन्मा.सदस्य श्री.नायर यांनी इतर जे काही विकासक व पुनर्विकासंबंधित जे मुद्दे उपस्थित केले ते मुद्दे बैठकीत चर्चेले जाण्यासारखे नसून आपण वैयक्तिक निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात जावून आपल्या शंकाचे निरासरण करुन घ्यावे, तसेच आवश्यकता असल्यास मला भेटून, त्याबबात चर्चा करण्याचे आश्वासन दिले. तसेच सदरची माहिती उपमुख्य अधिकारी/पुगा , निवासी कार्यकारी अधिकारी व सहमुख्य अधिकारी यांचे अखत्यारित असल्यामुळे सदर माहिती त्यांना देणेबाबत त्यांनी संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या.

**वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.**

**बाब क्रमांक - १४२-२ (१)**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध विभागातील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत**
**१. परिमंडळ- १ मधील (अ,सी-१,सी-२ व सी-३) १६ इमारती.**

-----o---o----

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **१९ ते २९** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४२/ १२५७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार १६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. २,६८,४०,६८३/-(रुपये- दोन कोटी अडुसष्ट लक्ष चाळीस हजार सहाशे त्र्याऐंशी फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,३९,०४,०३१/- (रुपये एक कोटी एकोणचाळीस लक्ष चार हजार एकतिस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १४२ -२ (२)**

विषय - २. **परिमंडळ-२ मधील (डी-१, डी-२, व ग-दक्षिण ) १० इमारती.**

---------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **३१ ते ३९** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १४२/१२५८

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १० उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,८२,९४,२०४ /-(रुपये- दोन कोटी बॅऐंशी लक्ष चौ-याण्णव हजार दोनशे चार फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,८६,२८,००६ /- (रुपये दोन कोटी श्याऐंशी लक्ष अठ्ठाविस हजार सहा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्रमांक - १४२. २ (३)**

विषय - **परिमंडळ-३ मधील ( बी-१ व बी-२ ) ११ इमारती.**

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.४१ ते ४७ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४२ /१२५९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ११उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,१९,१७,६६४ /- (रुपये- दोन कोटी एकोणविस लक्ष सतरा हजार सहाशे चौसष्ट फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,३२,८५,३३४ /- (रुपये एक कोटी बत्तीस लक्ष पंच्याऐंशी हजार तिनशे चौतीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

**बाब क्रमांक - १४२. २ (४ )**

**विषय - परिमंडळ-४ मधील ( ग-उत्तर, फ-दक्षिण ) ११ इमारती.**

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.४९ ते ५५ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक १४२/१२६०**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ११ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,७६,४८,७७५ /-(रुपये- दोन कोटी श्याहत्तर लक्ष अठ्ठेचाळीस हजार सातशे पंच्याहत्तर फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,५८,१७,१२६ /- (रुपये एक कोटी अठ्ठावन्न लक्ष सतरा हजार नऊशे सव्वीस फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------0-----0-----------

**बाब क्रमांक - १४२. २ (५)**

विषय - **परिमंडळ-१ मधील ( अ.सी-१ व सी-३ ) ३३ इमारती.**

----------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.५७ ते ६९ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

-----------0-0------0---------

**ठराव क्रमांक - १४२ /१२६१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ३३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.८,२६,०५,९२७ /-(रुपये- आठ कोटी सव्वीस लक्ष पाच हजार नऊशे सत्ताविस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ३,५८,९०,३६१ /- (रुपये तीन कोटी अठ्ठावन्न लक्ष नव्वद हजार तिनशे एकसष्ट फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------0-----0-----------

**बाब क्रमांक - १४२. २ (३)**

**विषय - ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह**
**१. इ.क्र.४, वखानी हाऊस, गोखले सोसायटी लेन, परेल, मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.**

----------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७१ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१४२/ १२६२**

सविस्तर चर्चेअंती **इ.क्र.४, वखानी हाऊस**, गोखले सोसायटी लेन, परेल, मुंबइ या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकास दि. ३०/६/२०१० रोजी झालेल्या १३२ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता रु.२३,८४,५९२/- या रकमेस प्रति चौ.मी. रु.१९९४.८१ /- या दराने काम मंडळामार्फत करण्यासाठी देण्यात आली होती. परंतु भाडेकरु/रहिवाशांनी सदर काम ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता प्रस्ताव दिल्यामुळे सदर काम मंडळामार्फत न करता ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

**बाब क्रमांक - १४२. ३ (२ )**

**विषय - ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह**
**२. इ.क्र.१२६, सी-डी, सिंग इस्टेट, दादासाहेब फाळके रोड, मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.**

---------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.७३ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१४२/ १२६३**

सविस्तर चर्चेअंती **इ.क्र.१२६, सी-डी**, सिंग इस्टेट, दादासाहेब फाळके रोड, मुंबई या मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकास दि. २९/ ११/२०१० रोजी झालेल्या १३३ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता रु.१८,६२,९६३/- या रकमेस प्रति_चौ.मी. रु. १०३५.५५ /- या दराने काम मंडळामार्फत करण्यासाठी देण्यात आली होती. परंतु भाडेकरु/रहिवाशांनी सदर काम ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता प्रस्ताव दिल्यामुळे सदर काम मंडळामार्फत न करता ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

**बाब क्रमांक - १४२ -(५) पुनर्विकास**

विषय - **मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.**

--------------o-------o------------

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासा करीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे ५ प्रस्ताव पृष्ठ क्र. ७५ ते ९३ वर मंजूरीसाठी सादर करण्यांत आले आहेत. सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

१. भूकर पहाणी क्र.३७७, परेल शिवडी विभाग, **इमारत क्र.३४-३४-अ,** परेल व्हिलेज, परेल, मुंबई-१२.

२. भूकर पहाणी क्र.२/३१५, ताडदेव विभाग, **इमारत क्र.२०१-ए,** जावजी दादाजी रोड, ताडदेव, मुंबई-३४ येथील ''**पालव चाळ**''.

३. भूकर पहाणी क्र.२३, दादर नायगांव विभाग इ.क्र.११, ११बीसी, १२ए व २४०ई, आदम मिस्त्री लेन, परळ, मुंबई १२ ''**बोरी चाळ**''.

४. भूकर पहाणी क्र.१७८२, माहिम विभाग, प्लॉट क्र.७२, शिवाजी पार्क स्कीम, इमारत
क्र.७१, केळुसकर रोड, दादर-(प) मुंबई २८ '**प्रभात बिल्डींग**'‚''.

५. भुकर पहाणी क्र.१३५२, गिरगाव विभाग, इ.क्र.६अे, बेनहम हॉल लेन, गिरगाव, मुंबई ४०० ००४ येथील '**जोशी बिल्डिंग**'.

<u>**ठराव क्रमांक - १४२ / १२६४**</u>

मुंबई बेटावरील अ वर्गातील खालील ०५ मालमत्तावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावास नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली .

१. भूकर पहाणी क्र.३७७, परेल शिवडी विभाग, **इमारत क्र.३४-३४-अ,** परेल व्हिलेज,
परेल, मुंबई-१२.

२. भूकर पहाणी क्र.२/३१५, ताडदेव विभाग, **इमारत क्र.२०१-ए,** जावजी दादाजी रोड, ताडदेव, मुंबई-३४ येथील ''**पालव चाळ**''.

३. भूकर पहाणी क्र.२३, दादर नायगांव विभाग इ.क्र.११, ११बीसी, १२ए व २४०ई, आदम मिस्त्री लेन, परळ, मुंबई १२ ''**बोरी चाळ**''.

४. भूकर पहाणी क्र.१७८२, माहिम विभाग, प्लॉट क्र.७२, शिवाजी पार्क स्कीम, इमारत
क्र.७१, केळुसकर रोड, दादर-(प) मुंबई २८ '**प्रभात बिल्डींग**'‚''.

५. भुकर पहाणी क्र.१३५२, गिरगाव विभाग, इ.क्र.६अे, बेनहम हॉल लेन, गिरगाव, मुंबई ४०० ००४ येथील '**जोशी बिल्डिंग**'.

-----------oo----------

**<u>मा.सभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या परवानगीने आयत्यावेळचे विषय घेण्याचे ठरले</u>**

<u>बाब क्र.१४२.(३)</u>

**विषय - इ.क्र.२६७ क्रीस व्हीला, आर.बी.मार्ग, मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.**
**" ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह "**

---------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र. वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक - १४२/ १२६५</u>**

सविस्तर चर्चेअंती **इ.क्र.२६७ क्रीस व्हीला, आर.बी.मार्ग, मुंबई या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशा** व अंदाजपत्रकास दि. १३/ ०१/२०१० रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीमध्ये प्रशासकीय मान्यता रु. २९,७१,८८२/- या रकमेस प्रति_चौ.मी. रु.१६०१.४१ /- या दराने काम मंडळामार्फत करण्यासाठी देण्यात आली होती. परंतु भाडेकरु/रहिवाशांनी सदर काम ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता प्रस्ताव दिल्यामुळे सदर काम मंडळामार्फत न करता ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करण्याकरिता सवानुमते मंजूरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

<u>बाब क्र.१४२.(३) शुध्दीपत्रक</u>

विषय - १. **इमारत क्र.१३ आबाबाई काशीनाथ मार्ग या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.**

-----------००-------

उपरोक्त प्रस्ताव पृष्ट क्र. वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती उक्त प्रस्तावात होणा-या बदलाबाबत स्पष्टीकरण तसेच पूर्वी दिलेल्या मान्यतेच्या प्रतीही सादर केल्या नाहीत त्यामुळे सदर प्रस्ताव मागे घेण्यात यावा व पुढील बैठकीत नव्याने विषय सादर करण्यात यावा असे मागील बैठकीत ठरल्यामुळे सदर प्रस्ताव पुन्हा सादर करण्यांत आला असून, चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक - १४२/ १२६६</u>**

सविस्तर चर्चेअंती **इमारत क्र.१३ आबाबाई काशीनाथ मार्ग** या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या पहिल्या टप्प्यातील दुरुस्ती करीता अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मंडळाच्या१३१ व्या बैठकीत देण्यांत आली होती. प्रशासकीय मान्यतेची रक्कम प्रशासकीय मान्यता देताना रु.४,९८,१९९/- अशी दर्शविण्यांत आली

होती. परंतु सदर प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.७,७०,२९७/- अशी पाहिजे होती. प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.४,९८,१९९/- ऐवजी रु.७,७०,२९७/- अशी वाचण्यास व रक्कम रु. ७,७०,२९७/- या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

--------------o-------o------------

बैठकीच्या शेवटी सचिव श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे उपसभापती तथा मुख्य अधिकारी मा.श्री. सुभाष हजारे यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेली असल्यामुळे आज त्यांची शेवटची बैठक असून त्यांना प्रेमाच्या निरोप देण्यासाठी उद्या दि.३०ऑगस्ट २०११ रोजी संध्या.४.०० वा. तिस-या मजल्यावरील भारतरत्न गुलझारीलाल नंदा सभागृहात निरोप संमारंभ आयोजित करण्यांत आलेला आहे सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांनी व मंडळाच्या अधिकारी/कर्मचा-यांना सदर कार्यक्रमास अवश्य हजर रहावे अशी विनंती केली.

यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे उपसभापती तथा मुख्य अधिकारी मा.श्री. सुभाष हजारे यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेली असल्यामुळे आज त्यांची शेवटची बैठक असून सर्व सन्मा सदस्यातर्फे त्यांचे धन्यवाद व्यक्त केले व त्यांनी असेही स्पष्ट केले की, मागील दोन ते अडीच वर्षाच्या कालावधीत आपण ब-याच गोष्टीबाबत धोरणात्मक निर्णय घेतले व मंडळातील मागील एक ते दीड वर्षाच्या कालावधीत सभापती नसूनही आम्हाला कधीही सभापतीची उणीव भासू दिली नाही, उलट तुम्ही सभापती व मुख्य अधिकारी अशी दोन्ही पदे उत्तमप्रकारे सांभाळली याबद्दल तुमचे करु तेवढे कौतुक कमी आहे.

तसेच मागील दोन ते अडीच वर्षाच्या कालावधीत तुम्ही उदा. मास्टस लिस्टबाबत एक चांगली योजना राबवून छोटा समित्या स्थापन करुन सर्व संबंधित भाडेकरुंच्या सुनावणी घेवून एक चांगल्या प्रकारे मास्टर लिस्ट तयार केली. तसेच हा सर्व कार्यालयीन दस्तऐवज व्यवस्थीत ठेवणेबाबतची प्रक्रिया करुन सर्व फॉईल स्कॉन करुन ठेवणे तसेच झालेल्याबाबत प्रकरणनिहाय्य निर्णय मंडळाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे अशी धोरणात्मक बाब ज्यामुळे भविष्यात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास पुष्कळ फायदा होणार आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे व्हेकेशन नोटीसचा नवीन नमुना तयार करणेबाबत आपण मागील एक ते दोन वर्षापासून त्याचा पाठपुरावा करुन एक चांगल्याप्रमारे व्हेकेशन नोटीस नमुना तयार केला याबद्दल तुमचे अभिनंदन.

एनओसी अंतर्गत प्राप्त होणा-या सदनिकांबाबतही आपण सक्त निर्णय घेवून सर्व गाळयाची तपासणी करुन एफआयआर नोंदविणेची कार्यवाही केली.

आपल्या सहकार्यामुळे एक अभ्यास गट नेमून अभ्यास गटाने सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही सुरु झालेली आहे.

तसेच उपकर प्राप्त व बिगर उपकर प्राप्त इमारतीस ना हरकत प्रमाणपत्राबाबतही आपण शासनाशी चर्चा करुन त्यामध्येही बरीच सुधारणा केलेली आहे.

३३ प्रकरणांवर म्हाडा देय क्षेत्र खुल्या बाजारात विकलेले आहे. त्याप्रकरणी संबंधित अधिका-यांना सूचना करुन उच्चस्तरावर चर्चा करुन एफ.आय.आर. ही नोंदविणेची कार्यवाही आपल्याच कालावधी होवू शकली.

डी.एस.आर.सुधारित करणेबाबतही आपण मा.मुख्य अभियंता-१ यांचेस्तरावर चर्चा केलेली असून याबाबतही कार्यवाही होत आहे.

मंडळातील कर्मचा-यांच्या कमतरनेमुळे भाडेकरुंना भाडे भरण्यास त्रास होवू नये याकरिता आपण विविधस्तरावर चर्चा करुन भाडेकरुन त्यांचे मासिक भाडे सारस्वत बँकेत भरण्याबाबतची कार्यवाही व निर्णय हा आपल्यास्तरावर होवू शकला.

उपमुख्य अधिकारी /पुगा व संगा कार्यालयात नस्त्या गहाळ होणे रेकॉर्ड वेळेत उपलब्ध न होणे ही नेहमिची बाब होती त्यामध्ये आपण सुधारणा घडवून आणून सर्व तांत्रिक अधिकारी/कर्मचारी वर्गातर्फे सर्व संक्रमण शिबिरातील भाडेकरुंकडून फॉर्म भरुन घेवून तो सर्व रेकॉर्ड कार्यालयात संगणकावर ठेवण्यांत आलेला आहे. त्यामुळे आता कोणत्या संक्रमण शिबिरात कोण रहातो हे कार्यालयात आपल्या कळू शकते. त्यामुळे घुसखोरीस नक्कीय आळा बसलेला असून वितरणास स्थगिती दिल्यामुळे बोगस वितरण टळलेले आहे.

तसेच त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की. पीएमजीपी प्रकल्पातर्फे ज्या इमारती बांधलेल्या आहेत. त्यांचेबाबतही आपण धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. याबाबत आम्हीसर्व सन्मा.सदस्य आपले आभार व अभिनंदन करीत आहेत.

तद्नंतर त्यांनी सर्व सन्मा.सदस्यातर्फे त्यांना फुलाच्या गुच्छ देवून त्यांचा सत्कार केला तसेच उर्वरित आयुष्य सुखाचे व सुखसमृध्दीचे लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना ~~करतो~~ केली.

तद्नंतर सहमुख्य अधिकारी श्री.सुरवाडे,निवासी कार्यकारी अभियंता श्री.महिषी,उपमुख्य अभियंता,परिमंडळ-१,२,३ व ४ यांनीही पुष्प गुच्छ देवून श्री.सुभाष हजारे यांचा सत्कार केला

सत्कारास उत्तर देताना मा.मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून आपले मनोगत व्यक्त केले. मागील दोन ते अडीच वर्षाच्या कालावधीत मंडळातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना मला उत्तमप्रकारे सहकार्य केलेले आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय मी जे काही बदल केलेले आहेत, जे काही धोरणात्मक निर्णय घेतलेले आहे ते त्यांचा मदतीनेच, याबद्दल त्यांचा मी शतशः आभार मानतो, तसेच मी महसूल अधिकारी असून बाहेरचा आहे अशी वागणूक मला म्हाडामध्ये मिळालेली नाही. विशेष म्हणजे मी तांत्रिक

अधिकारी/कर्मचा-यांकडून अतांत्रिक कामे करुन घेतली ती त्यांनी उत्तम प्रकारे पारही पाडलेली आहे. याबद्दल त्यांनी सर्वाचे आभार व कौतुक केले.

मा.सभापती श्री.सचिन अहिर होते पण त्यांनीही मला चांगल्याप्रकारे सहकार्य केल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीच्या अखेरीस सर्व सन्मा.सदस्याचे व सर्व अधिकारी/कर्मचारी -यांचे मी आभार मानून आपण केलेल्या मोल्याच्या सहकार्याबद्दल धन्यवाद् व्यक्त केले.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.-

**सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता**
**मुं.इ.दु.व पु.मंडळ.**

**मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,**
**मुं.इ. दु.व पु.मंडळ**